**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**
**(नॅकद्वारा 'अ' मानांकन प्राप्त)**

**जनसंपर्क विभाग**

---

## सामाजिक उत्तरदायित्व निधी मिळविण्यासाठी महाविद्यालयांनी प्रयत्न करावा - प्रा. दिनेश सुर्यवंशी
## विद्यापीठात सामाजिक उत्तरदायित्व निधी (सी.एस.आर.) वर माहिती कार्यशाळेचे उद्‌घाटन संपन्न

अमरावती -

शिक्षण क्षेत्रातून सामाजिक विकास होत असून शिक्षण क्षेत्राच्या विकासाकरीता आणि त्या माध्यमातून सामाजिक विकासासाठी सामाजिक उत्तरदायित्व निधी मोठ्या प्रमाणावर मिळविण्याची गरज आहे. विद्यापीठ आणि महाविद्यालयांना विविध वित्तीय संस्थांकडून प्राप्त होणारा निधी कमी झाला असून विविध कंपन्यांच्या सी.एस.आर. मधून निधी मिळावा, त्यासाठी तयार करावयाचा प्रस्ताव, मिळवावयाचा निधी यासंदर्भात कार्यशाळेत होणारे विचारमंथन महत्वपूर्ण असल्याचे प्रतिपादन राज्यपाल नामित व्य.प. सदस्य प्रा. दिनेश सुर्यवंशी यांनी केले. विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व विस्तार विभागाद्वारे सामाजिक उत्तरदायित्व निधी (सी.एस.आर.) वर माहिती कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले, त्याप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून मार्गदर्शन करतांना ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. मुरलीधर चांदेकर, व्य.प. सदस्य डॉ. संजय डुडूल, अधिसभा सदस्य ॲड. अतुल भारद्वाज, सी.एस.आर. कन्सलटन्ट, पुणेचे श्री मयुर बागुल, रेमन्ड गृपचे तथा विद्या परिषद सदस्य श्री भूपेन्द्र शहाणे, आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे संचालक डॉ. श्रीकांत पाटील उपस्थित होते.

मार्गदर्शन करतांना व्य.प. सदस्य प्रा. दिनेश सुर्यवंशी म्हणाले, शिक्षण, संशोधनासह सामाजिक उत्तरदायित्व विद्यापीठ कायद्यात सांगितले आहे. विद्यापीठ व महाविद्यालयांच्या सामाजिक उपक्रमाच्या विकासासाठी सी.एस.आर. कार्यशाळा महत्वाची आहे. पहिल्यांदाच सी.एस.आर. उपक्रमांसाठी बजेटमध्ये तरतूद करण्यात आली होती. सी.एस.आर. अंतर्गत महाविद्यालयांमध्ये विविध उपक्रम, योजना राबविण्यासाठी निधी मिळतो, त्यासाठी प्रक्रिया व माहिती कार्यशाळेच्या माध्यमातून महाविद्यालयांना मिळणार असून विद्यार्थ्यांना आवश्यक सुविधा उपलब्ध होणास मोलाची मदत होणार आहे. विद्यापीठासह महाविद्यालयांसाठी सी.एस.आर. उपक्रम राबविण्यासाठी आयोजित कार्यशाळा मैलाचा दगड ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

अध्यक्षीय भाषणातून कुलगुरू डॉ. मुरलीधर चांदेकर म्हणाले, व्य.प. सदस्य प्रा. दिनेश सुर्यवंशी यांनी व्यवस्थापन परिषद सभेत सी.एस.आर. फंड बाबतचा विषय मांडला, त्याची फलश्रुती आजची कार्यशाळा आहे. यु.जी.सी. ने अनुदान देणे बंद केले असून जागतिक शैक्षणिक स्पर्धेसह अनेक आव्हाने विद्यापीठ व महाविद्यालयांसमोर असून त्यासाठी आर्थिक विषय महत्वाचा आहे.

तीन लक्ष रुपयांचा सी.एस.आर. निधी पहिल्यांदा श्री भूपेंद्रजी शहाणे यांनी विद्यापीठाला दिला. विद्यापीठाने आपल्या स्तरावर कॉलेज स्टुडन्ट रिस्पॉन्सिबिलिटी सुरु केला असून प्रत्येक महाविद्यालयांना सी.एस.आर. च्या नावाने अकाऊंट सुरु करुन शिक्षकांच्या अकाऊंटमधून शंभर रुपये प्रति महिना देण्याचे आवाहन केले आहे. चांगला उपक्रम या माध्यमातून सुरु झाला आहे. भविष्यात महाविद्यालयांना जाणवणारी आर्थिक अडचण लक्षात घेता सी.एस.आर. महत्वाचा उपक्रम असून त्यांची अंमलबजावणी प्रामाणिकपणे व सातत्यपूर्ण प्रयत्नशील राहून प्रत्येकांनी करावी, असे आवाहन त्यांनी केले. हा उपक्रम विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी महत्वाचा असल्याचेही कुलगुरूंनी सांगितले.

प्रथम सत्रात 'सामाजिक उत्तरदायित्व निधी विषयी माहिती व उपयोगिता' या विषयावर श्री भूपेन्द्र शहाणे यांनी, तर द्वितीय सत्रात 'सामाजिक उत्तरदायित्व निधी प्राप्तीसाठी करावयाची कार्यवाही' या विषयावर श्री मयुर बागुल यांचे व्याख्यान संपन्न झाले. प्रथम सत्रात अध्यक्षस्थानी इनकम टॅक्स कन्सलटन्ट तथा अधिसभा सदस्य ॲड. अमोल ठाकरे, आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे सदस्य डॉ. अंबादास मोहिते उपस्थित होते. समारोपप्रसंगी अध्यक्षस्थान व्य.प. सदस्य डॉ. अरुणा पाटील यांनी भूषविले. यावेळी कुलसचिव डॉ. तुषार देशमुख यांची उपस्थिती लाभली.

राष्ट्रगीत व विद्यापीठ गीताने सुरु झालेल्या कार्यक्रमात कर्मयोगी संत गाडगे बाबांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन करण्यात आले. रोपटं व पुस्तक देवून पाहुण्यांचे स्वागत करण्यात आले. प्रास्ताविकतेतून संचालक डॉ. श्रीकांत पाटील यांनी कार्यशाळेमागील भूमिका विषद केली. संचालन व आभार डॉ. चेतन राऊत यांनी मानले. कार्यशाळेमध्ये जवळपास शंभराचे वर महाविद्यालयांचे प्रतिनिधींनी नोंदणी केली. कार्यक्रमाला महाविद्यालयांचे प्राचार्य, शिक्षक व प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

प्रति, **जनसंपर्क विभाग**

मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी दि. ०४/०३/२०२०.

दै.............................. अमरावती.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी

C:\Users\PRO\Desktop\UNIVERSITY NEWS 2020 38